# <u>७. होळी</u>

१४ मार्चला सकाळी फोन येत होते. प्रत्येक जण होळीच्या शुभेच्छा देत होता. एकाने सहज विचारले कि Sir आपण होळी खेळता का ? मी म्हटले नाही. पण कोणी रंग लावायला आले तर ? मी म्हटले कि मला रंग लावायला कोणीही येत नाही. परंतु क्षणातच मी सांगून टाकले कि मी तुझ्या कल्पनेतील नसेन होळी खेळत पण वर्षभर होळीच तर खेळत असतो. फोनवर मला दिसणे शक्य नव्हते पण नक्कीच त्याच्या तोंडाचा चंबू झाला असणार. जास्त बोलायला वेळ नव्हता म्हणून फोनवरील इतर संभाषण आटोपते घेतले.

मी जेव्हा माझ्या वाक्याचा विचार करू लागलो तेव्हा मला पटकन जाणवले की माझे वाक्य जे सहजतेने बोलले गेले होते ते बरोबरच होते.

पेशाने Accountant / Auditor असण्यामुळे वर्षभर विविध रंगाची पेन घेऊन तर मी काम करत असतो. लाल, हिरवा, काळा, निळा, Marking Pens वगैरे.
बरेच वर्षे पेपर तपासणीकाचे काम केले तेव्हातर लाल रंगाबरोबर जवळीक झाली होती.
आपण सर्वजण रंगाशिवाय जगूच शकत नाही. बिनरंगाचे विश्व्च असूच शकत नाही.

आपल्या आयुष्यातील वाटचालीत आपला रंगांशी खूपच जवळचा संबंध येतो. तरूणपणी प्रेमात पडल्यावर गालावर गुलाबी रंग पसरतो. तर लहानपणी अभ्यास न केल्याबद्यल गुरूजींनी गालावर उमटवलेल्या पाच बोटात लाल रंग उधळतात. रागाने आपण लाल होतो ते वेगळेच. दुस-याचा उत्कर्ष बघून आपला चेहरा काळा ठिक्कर पडतो.
आपल्यावर दुःखाचे प्रसंग येतात तेव्हा आपल्या डोळयासमोर अंधारी येते.

आपल्या प्रत्येक कृतीत रंग हे असतातच. कधी ते दिसतात कधी ते दिसत नाहीत. पण त्यांचे अस्तित्व आपल्याला जाणवते.
रंग व आपले आरोग्य याचे जवळचे नाते आहे. वेगवेगळया रंगाच्या बाटलीतील पाणी आरोग्यासाठी उपयोगी ठरते.

असे सर्व असतानासुद्धा लोकांना होळी / धुलीवंदन का करावेसे वाटते ? कि दुस-याना रंग फासून आपल्या मनातील विकार ते बाहेर काढत असतात ?

मित्रांनो कराल विचार ? मला जरूर कळवा....